पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११७०/२०१७
दिनांक : २९/०९/२०१७

प्रति,

मा.......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष सभा दिनांक **०५/१०/२०१७** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची विशेष सभा गुरुवार दिनांक **०५/१०/२०१७** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शहर सुधारणा समिती (विशेष सभा)

**कार्यपत्रिका क्रमांक – १२**

दिनांक : **०५/१०/२०१७** वेळ : दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष सभा गुरुवार दिनांक **०५/१०/२०१७**रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील १८.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरररसदस्य व नागरिकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी.रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील रस्त्यांचा वाहतुकीचे दृष्टीकोनातून विकास करणे आवश्यक आहे. मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील १२.०० मी. रस्त्याचा विकास करणेकामी सदर भागातील मा. नगरसदस्य व नागरिक यांची मागणी आहे. सदरचे गावातील नागरिकांच्या वाहतूकीसाठी रस्ता विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरररसदस्य व नागरिंकांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे वाहतूकीच्या हितार्थ मौजे किवळे स.नं.७३ ते ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील जमिनीचे भूसंपादन, नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं.७१ व ७२ येथील आरक्षण क्र.४/११७ - उद्यान या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदरचे उद्यानाचा विकास केल्याने गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी सदरचे उद्यान विकसित होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आ.क्र.४/११७ – उद्यान हे विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात अद्यापि एकही उद्यान विकसित करणेत आलेले नाही. सबब मा.नगरररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं. ७१ व ७२ मधील आरक्षण क्र.4/117 उद्यान या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३

अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील मौजे किवळे येथील स.नं. ४० येथील आ.क्र. ४/१२२ – दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या प्रस्तावित आरक्षणाचा विकास करणेकामी मा.नगरसदस्य यांची मागणी आहे. सदर आरक्षण क्र.४/१२२- दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाचा विकास गावातील नागरिक, जेष्ठ नागरिक, महिला व मुलांच्या आरोग्यासाठी होणे गरजेचे आहे. मा.नगरसदस्य यांनी मागणी केलेले आरक्षण क्र.४/१२२ - दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) हे आरक्षण विकास नगर, किवळे या परिसरात असून सदर भागात महानगरपालिकेतर्फे आरोग्य विषयक सुविधा विकसित करणेत आलेली नाही. सबब मा.नगररसदस्य यांचे मागणीचे अनुषंगाने नागरिकांचे हितार्थ विकासनगर, किवळे स.नं.४० मधील आरक्षण क्र. ४/१२२ – दवाखाना व प्रसुतिगृह (DMH) या आरक्षणाखालील जमिनीचे भूसंपादन नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/११७०/२०१७
दिनांक : २९/१०/२०१७ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.